**सी.एन.आर.नं.एम.एच.आर.जी.०७००१४०५२०२२**

## <u>फौजदारी चौकशी अर्ज क्र २८७/२०२२ मधील नि १ वरील आदेशः–</u>

**श्रीमती.ताराबाई गजानन मिसाळ**

**उर्फ ताराबाई काळु जाधव**

वयः ४६वर्षे,व्यवसाय–शेती ........ **अर्जदार**

रा.अंथ्राड तर्फे निड,पो.वाकस,ता.कर्जत.जि.रायगड.

विरुध्द

सरपंच/ग्रामसेवक,

ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली, .......... **सामनेवाला.**

पो.सुगवे,ता.कर्जत.जि.रायगड.

...........................................................................................................

**अर्ज जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३(३)प्रमाणे**

**अर्जदारातर्फे विधिज्ञ . ॲड.शैलेश चवळे**

PRAJKTA S APTE Digitally signed by PRAJKTA S APTE Date: 2023.03.03 16:48:32 +0530

...........................................................................................................

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार श्रीमती.ताराबाई गजानन मिसाळ उर्फ ताराबाई काळु जाधव यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९७६ रोजी, मौजे बोरीवली,पो.सुगवे,ता.कर्जत,जि.रायगड येथे जन्म झालेबाबत ग्रुप ग्रामपंचायत, बोरीवली, ता.कर्जत जि. रायगड. येथे जन्माची नोंद करणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार श्रीमती.ताराबाई गजानन मिसाळ उर्फ ताराबाई काळु जाधव हे मौजे अंथ्राड तर्फे निड ता.कर्जत.जि.रायगड येथील रहिवासी आहेत. अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली,ता.कर्जत जि. रायगड. येथे करण्याची अनावधानाने राहून गेली आहे. अर्जदाराच्या जन्माच्या दाखल्याची भविष्यात आवश्यकता आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराने त्याच्या कथनाप्रित्यर्थ शपथपत्र (निशाणी ९) वर दाखल केले आहे. अर्जदाराने अर्जासोबत ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली , यांनी अर्जदार यांच्या जन्माची नोंद नसलेबाबत दिलेला जन्माचा दाखला (निशाणी १०) वर दाखल केला आहे. अर्जदारातर्फे अर्जदाराच्या आधारकार्डची छायांकित प्रत (निशाणी १३) वर

दाखल केली आहे.  अर्जदार यांनी दाखल केलेली " दैनिक कृषीवल " या वर्तमानपत्रातील जाहीर नोटीस दिनांक ०२/११/२०२२ (निशाणी १२) सादर केली आहे. अर्जदार यांनी पुरावा बंद पुरसिस (निशाणी १३) दाखल केली आहे.

४. अर्जदाराच्या शपथपत्रातील मजकूर त्याच्या अर्जातील कथनांचा पुर्नुःच्चार आहे. " दैनिक कृषीवल " या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस देवून देखील एक महिन्याच्या कालावधीतपर्यत त्याला कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन त्याच्या कथनाला पुष्टी मिळते. अर्जदाराचा अर्ज विनाआव्हानित राहिला आहे. अर्जदार श्रीमती.ताराबाई गजानन मिसाळ उर्फ ताराबाई काळु जाधव  याच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत,बोरीवली,पो.सुगवे, ता.कर्जत जि. रायगड. येथे जन्माची नोंद करण्यास तो पात्र आहे. करिता आदेशः–

**:: आदेश ::**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार श्रीमती.ताराबाई गजानन मिसाळ उर्फ ताराबाई काळु जाधव यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९७६ रोजी, मौजे अंथ्राड तर्फे,ता.कर्जत जि.रायगड. येथे जन्माची नोंद झालेबाबत ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली, पो.सुगवे,ता.कर्जत जि. रायगड. यांना आदेश देणेत येत आहे. |

PRAJKTA S APTE

Digitally signed by PRAJKTA S APTE
Date: 2023.03.03 16:48:43 +0530

**(श्रीमती.पी.एस.आपटे)**

दिनांकः ०३/०३/ २०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कर्जत

ठिकाणः कर्जत जि.रायगड.